*भा. पा. हिवाळे शिक्षण संस्था संचालित,*

*ग्रामीण विकास अध्ययन केंद्र - समाजकार्य व संशोधन संस्था, अहमदनगर*

---

## विषय

# कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि काळजी

- **प्रशिक्षणार्थीचे नाव-** शिमोन सुभाष खंडागळे
- **वर्ग-** MSW-II
- **क्षेत्रकार्य समुदायाचे नाव-** तिसगाव, ता- पाथर्डी, जि- अहमदनगर,
- **क्षेत्रकार्य मार्गदर्शकाचे नाव-** प्रा. डॉ. सुरेश मुगुटमल सर

## ▪ क्षेत्रकार्य विभागाची ओळख

तिसगाव हे गाव अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील एक ऐतिहासिक असे गाव आहे. तिसगाव हे पाथर्डी तालुक्यातील सर्वात मोठे व मोठी बाजरपेठ ओळख असलेले गाव आहे. तिसगाव गावातून राष्ट्रीय महामार्ग २२२ कल्याण - विशाखापट्‌टणम हा गेलेला असल्याने गावाला विशेष ओळख प्राप्त झाली आहे. तिसगाव हे पाथर्डी पासुन १२ किमी अंतरावर तर अहमदनगर पासुन ५३ किमी अंतरावर वसलेले आहे. गावाचे क्षेत्रफळ हे १५०६ हेक्टर इतके आहे.

| एकूण लोकसंख्या | ७७०७ |
|---|---|
| पुरुष | ३९७२ |
| महिला | ३७३५ |
| साक्षरता | ८३.७२% |
| पुरुष साक्षरता | ८९.९९% |
| महिला साक्षरता | ७७.१८% |
| कामगाराची संख्या | २८३५ |

सदर माहिती २०११ च्या जनगणनेनुसार

**सरपंच-** श्री. काशिनाथ लवांडे पाटील

**उपसरपंच-** श्री. इलियास शेख सर

**ग्रामसेवक-** श्री. भाऊसाहेब सावंत

# Activities

- **गृहभेटीच्या माध्यमातून कोरोना लसीकरणाबाबतीत जनजागृती.**

समुदायात नागरिकांच्या गृहभेटी घेऊन त्यांच्यात लसीकरणाबाबतीत जनजागृती करण्यात आली. यात समुदायात असणाऱ्या वेगवेगळ्या प्रभागात जाऊन त्या प्रभागातील नागरिकांच्या गृहभेटी घेऊन त्यांना कोरोना या विषाणूवर प्रतिबंध करण्यासाठी लसीकरण करणे किती गरजेचे आहे याबाबत महत्व सांगण्यात आले तसेच अनेक नागरिकांमध्ये कोरोनाच्या लसीबाबत वेगवेगळे गैरसमज, पूर्वग्रह आहेत ते यावेळी या गृहभेटीच्या माध्यमातून दूर करून त्यांना लस घेण्यास प्रवृत्त करण्यात आले. या भेटीद्वारे त्यांना लसीकरणाबाबतीत प्रक्रिया समजावून सांगण्यात आली व या लस घेण्यासाठी जे इच्छुक आहेत अशा सर्वांची माहिती घेण्यात आली.

## लसीकरणासाठी नागरिकांच्या ऑनलाईन नोंदणी.

समुदायात गृहभेटी करत असताना जे नागरिक लस घेण्यासाठी इच्छुक आहेत अशा सर्व नागरिकांच्या तसेच ज्यांना ऑनलाईन नोंदणी करताना अडचणी येतात अशा नागरिकांच्या ऑनलाईन cowin वर नोंदणी करण्यात आल्या. यासाठी त्यांचा आधार कार्ड नं व मोबाईल क्र. याच्या मदतीने त्यांची नोंदणी करून घेण्यात आली.

## आशावर्कर आणि अंगणवाडी सेविका यांच्या मदतीने समुदायात सर्व्हे करणे.

समुदायात रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे काहींना प्राथमिक लक्षणे असून सुद्धा ती कोरोना चाचणी करत नाहीत यामुळे समुदायात अंगणवाडी सेविका व आशावर्कर यांच्या मदतीने समुदायातील वेगवेगळ्या प्रभागात कुटुंबांच्या गृहभेटी घेण्यात आल्या. यात कुटुंबातील सदस्यांना काही लक्षणे आहेत का याबाबत विचारपूस करण्यात आली.

- **समुदायात कोरोना चाचणी कॅम्प आयोजित करणे.**

  समुदायात आशावार्कर व अंगणवाडी सेविका यांच्या मदतीने करण्यात आलेल्या गृहभेटीतुन ज्यांना कोरोनाची प्राथमिक लक्षणे आढळून आली अशा नागरिकांसाठी समुदायातील ग्रामपंचायत कार्यालय येथे कोरोना चाचणी कॅम्प आयोजित करण्यात आला. दुकानदार, नागरिक यांना भेटून त्यांना या कॅम्प बद्दल माहिती देण्यात आली व ज्या नागरिकांना काही लक्षणे आहेत अशा नागरिकांची यावेळी रॅपिड टेस्ट करण्यात आली.

- **मुलांमध्ये हॅण्ड वॉश उपक्रम राबवणे.**

  कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा लहान मुलांवरील संभाव्य धोका लक्षात घेता समुदायात मुलांचा गटकार्याच्या माध्यमातून हॅण्ड वॉश उपक्रम राबवण्यात आला. कोरोना प्रतिबंधात्मक काळजी या साठी मुलांमध्ये हॅण्ड वॉश तसेच नियमित मास्क वापरणे मास्क कशा प्रकारे तोंडाला लावावा याबाबत त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## ❖ निरीक्षण - (Observation)

- समुदायात कोरोनाच्या पहिल्या लाटेपेक्षा दुसऱ्या लाटेत अनेक समस्या दिसून आल्या यात अनेकांना आपला जीव गमवावा लागला.
- समुदायात अनेक तरुणांना आपला रोजगार गमवावा लागला त्यामुळे ती मानसिक ताण-तणावात असल्याचे निरीक्षणास आले.
- समुदायात लसीकरणाबाबतीत अनेक गैरसमज आहेत त्यामुळे नागरिक लस घेत नाहीत असे निरीक्षणास आले.
- प्राथमिक लक्षणे असूनही काही नागरिक कोरोना चाचणी करत नाहीत असे निरीक्षणास आले.
- कोरोना काळात समुदायात बेरोजगारी वाढल्याचे निरीक्षणास आले.

## ❖ शिकण्यास मिळालेल्या बाबी - (Learning)

- प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामपंचायत यांच्या कामकाजाबद्दल माहिती शिकण्यास मिळाली.
- अडचणीच्या परिस्थिती मध्ये काम करण्याची क्षमता वाढली व यातून समस्या निवारण कौशल्य, संवाद कौशल्य, व्यवस्थापन आणि नियोजन, नेतृत्व कौशल्य इ. कौशल्यामध्ये वाढ झाली.
- लसीकरण केंद्रावर लसीकरणाची प्रक्रिया शिकण्यास मिळाली.
- भावना नियंत्रणाचे तत्व व स्व निर्णयाचे तत्व आत्मसात करून शिकण्यास मिळाले.

## ❖ आव्हाने - (Challenges)

- समुदायातील काही नागरिक शेतीची कामे करण्यासाठी लवकरच शेतात जात असल्याने अशा नागरिकांची भेट घेण्यास अडचणी आल्या.
- लसीकरणाबाबतीत काही नागरिकांमध्ये वेगवेगळे गैरसमज आहेत त्यामुळे ती लस घेण्यात तयार नव्हते त्यामुळे त्यांचे लसीकरण करते वेळी अडचणी आल्या.
- सरकारी नियमानुसार दुपारी ४ नंतर संचारबंदी लागू असल्याने क्षेत्रकार्य करत असताना अनेक अडचणीचा सामना करावा लागला.

# धन्यवाद !